**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

राज्यातील विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची बैठक **दि.०५-०१-२०२२ रोजी स.१०:३० वाजता** मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली **शिक्षण शुल्क समिती, शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय आवार, १ ला मजला, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१ या ठिकाणी पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ..**

**सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते:-**

| **अ.क्र.** | **उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | **अध्यक्ष** |
| २ | मा.श्री बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग, मा.सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी | **सदस्य** |
| ३ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | **सदस्य सचिव** |
| ४ | डॉ. नंदा पांढरीकर, विभागप्रमुख गणित व संख्याशास्त्र विभाग (प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई यांच्या प्रतिनिधी) | **सदस्य** |
| ५ | श्री.व्ही.बी. शर्मा, सनदी लेखापाल | **सदस्य** |
| ६ | डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन, पुणे | **सदस्य** |
| ७ | डॉ. अंजली ठाकरे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, श्री. शिवाजी कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन, अमरावती | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | **सदस्य** |

विशेष निमंत्रित म्हणून श्री. दत्तात्रय कहार, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई, डॉ. सुशीलकुमार चौधरी, सह. प्राध्यापक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई, श्री. सुनिल सोनवणे, सहा. प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई तथा शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ व श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल हे उपस्थित होते.

सदर बैठकीच्या सुरूवातीस मा.सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी समितीच्या मागील बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यपूर्तीबाबतचा अहवाल समितीस सादर केला. त्यानंतर शिक्षण शुल्क समितीची स्थापना, उद्देश विशद केला व समितीच्या नियमावलीविषयी मा.सदस्यांना माहिती दिली.

सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०२१-२२ करिताच्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या १८९ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

समितीच्या मागील बैठकीत दिलेल्या निर्देशानूसार सन २०१९-२० मध्ये ज्या महाविद्यालयांनी शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव या कार्यालयास सादर केले होते त्यांच्याकडून नव्याने प्रस्ताव न मागविता सन २०२०-२१ लेखापरिक्षण अहवाल व इतर आवश्यक अभिलेख मागविण्यात आले होते. सदर अहवालाचे तपासणी करून महाविद्यालयांचे सन २०२१-२२ चे शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे.

**परिशिष्ट अ -** बैठकीत ठेवलेल्या बी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण १५२ महाविद्यालयांपैकी मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ४१, २० टक्क्यांपेक्षा कमी वाढ असलेल्या २१ तसेच २० टक्के वाढ असलेल्या ८१ महाविद्यालयांच्या शिक्षण शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट ब-** बैठकीत ठेवलेल्या एम. एड. अभ्यासक्रमाच्या एकूण १६ महाविद्यालयांपैकी मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०४, २० टक्क्यांपेक्षा कमी वाढ असलेल्या ०२ तसेच २० टक्के वाढ असलेल्या ०६ महाविद्यालयांच्या शिक्षण शुल्कास मान्यता देण्यात आली.

शुल्क निश्चितीचे अभिलेख सादर केलेल्या शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा व शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल यांच्या तसेच इतर शासकीय महाविद्यालयातील

विनाअनुदानित एम.एड अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र, पुणे यांनी शासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेवून शुल्क निश्चितीची कार्यवाही करून त्याचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीत सादर करावा.

**परिशिष्ट क-** बैठकीत ठेवलेल्या बी.पी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण १० महाविद्यालयांपैकी मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०२, २० टक्क्यांपेक्षा कमी वाढ असलेल्या ०२ व २० टक्के वाढ असलेल्या ०५ महाविद्यालयांच्या शिक्षण शुल्कास मान्यता देण्यात आली. तसेच राणीबाई अग्निहोत्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, वर्धा यांच्या प्रस्तावानूसार शुल्कामध्ये वाढ होत असताना देखील महाविद्यालयाच्या विनंतीनूसार यापूर्वी समितीने मंजूर केलेले शिक्षण शुल्क कायम करण्यात आले.

**परिशिष्ट ड-** बैठकीत ठेवलेल्या एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण १० महाविद्यालयांपैकी २० टक्क्यांपेक्षा कमी वाढ असलेल्या ०५, २० टक्के वाढ असलेल्या ०४ महाविद्यालयांच्या शिक्षण शुल्कास मान्यता देण्यात आली. तसेच राणीबाई अग्निहोत्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, वर्धा यांच्या प्रस्तावानूसार शुल्कामध्ये वाढ होत असताना देखील महाविद्यालयाच्या विनंतीनूसार यापूर्वी समितीने मंजूर केलेले शिक्षण शुल्क कायम करण्यात आले.

**परिशिष्ट इ-** बैठकीत ठेवलेल्या एकात्मिक बी.ए.बी.एड अभ्यासक्रमाच्या २० टक्के वाढ असलेल्या ०१ महाविद्यालयाच्या शिक्षण शुल्कास मान्यता देण्यात आली.

सन २०१९-२० मध्ये ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले होते, त्यापैकी सन २०२१-२२ ला शुल्क निश्चितीसाठी अभिलेख सादर केलेल्या **परिशिष्ट अ** मधील उर्वरित ९ व **परिशिष्ट ब** मधील उर्वरित २ महाविद्यालयांच्या सन २०१८-१९ च्या लेखापरिक्षण अहवालामधील नमुद केलेल्या वेतनावरील खर्चात सन २०२०-२१ मध्ये २५ टक्के पेक्षा जास्त वाढ झालेली आहे, त्यामुळे शुल्कात मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे, अशा महाविद्यालयांकडून वाढीव खर्चाबाबतचा तपशील मागवून तो तपासून समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा, असा निर्णय झाला.

**विषय क्र.०२ व ०३:- शै.वर्ष २०१९-२० ला शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांकडून २०२०-२१ च्या लेखापरिक्षण अहवालासह शै.वर्ष २०२१-२२ साठीचे शुल्क निश्चिती करण्यासाठी अभिलेख सादर करण्याबाबत कळविले होते तथापि असे अभिलेख सादर न केलेल्या महाविद्यालयांच्या शुल्क निश्चितीबाबत.**

:-एनसीटीईच्या दि.१८ जून,२००२ च्या नोटीफिकेशन नूसार तसेच शा.नि.दि.०५.०७.२०१३ नुसार विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी दर ३ वर्षांनी शुल्क निश्चित करून घेणे बंधनकारक आहे, सदर महाविद्यालयांनी सन २०२०-२१ चा

लेखापरिक्षण अहवालासह अभिलेख सादर न केल्यामुळे अशा महाविद्यालयांचे शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

ज्या महाविद्यालयांनी सन २०१९-२० मध्ये प्रस्ताव सादर केले होते, अशा महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात घट होत आहे, त्यांचे शुल्क मान्य करण्यात आले **(परिशिष्ट अ १ - बी.एड, परिशिष्ट ब १ - एम.एड, परिशिष्ट क १ - बी.पी.एड व परिशिष्ट ड १ - एम.पी.एड)**

तसेच ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात वाढ होत आहे, अशा महाविद्यालयांबाबत समितीमध्ये चर्चा झाली, सदर महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावांतील लेखापरिक्षण अहवाल हे २०१८-१९ चे असल्यामुळे त्यानंतर महाविद्यालयांचे खर्च व इतर बाबी यामध्ये तफावत असू शकते, त्यामुळे अशा महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क हे त्यांना समितीने यापूर्वीच अंतिम मंजूर केलेल्या शुल्काप्रमाणे ठेवण्यात यावे,असा निर्णय घेण्यात आला. **(परिशिष्ट अ २-बी.एड, परिशिष्ट ब २-एम.एड, परिशिष्ट क १-बी.पी.एड व परिशिष्ट ड २-एम.पी.एड)**

सबब खालील परिशिष्टातील महाविद्यालयांना शुल्क वाढ हवी असल्यास त्यांनी सन २०२१-२२ चे लेखापरिक्षण अहवालासह नव्याने प्रस्ताव सादर केल्यास त्यानूसार शुल्क निश्चितीची कार्यवाही करण्यात येईल. अन्यथा सदर शिक्षण शुल्क हे तीन वर्षाकरिता लागू राहील.

परिशिष्ट अ १ बी.एड -३१

परिशिष्ट अ २ बी.एड -५५

परिशिष्ट ब १ एम.एड -०५

परिशिष्ट ब २ एम.एड -०१

परिशिष्ट क १ बी.पी.एड -०५

परिशिष्ट क २ बी.पी.एड -०७

परिशिष्ट ड १ एम.पी.एड -०१

परिशिष्ट ड २ एम.पी.एड -०७

समितीने निश्चित करून दिलेले शिक्षण शुल्क हे जी महाविद्यालये सन २०२१-२२ च्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट आहेत, त्यांनाच लागू राहील.

**विकास शुल्क मंजूरीबाबत**

वरीलप्रमाणे शुल्क निश्चिती करीत असताना विकास शुल्काबाबत समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.६ तसेच एन.सी.टी.ई. च्या १८, जून २००२ च्या अधिसूचनेतील नियम क्र.८ (१)व(३) बाबत समितीमध्ये चर्चा झाली.

**अ)** समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.६.१ मध्ये खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

**2.6.0 THE DEVELOPMENT FUND WILL BE AS UNDER-**

2.6.1 The Fee: - Reasonable surplus, meant for development or expansion of the College/Institution is fixed on the basis of 10% of the tuition fee

2.6.2 This development fee could be charged only if the institution has provided all the infrastructure and facilities as per norms and future development plan with proposal.

2.6.3 A copy of the latest UGC, NCTE/RCI/ GOVT/UNIV to collect the development fund is required to be submitted along with the separate proposal of development fee to levy this fee.

2.6.4 In Audit reports, this head should be shown separately.

2.6.5 The development fund should be used for which it is meant for.

**ब)** एन.सी.टी.ई. च्या १८, जून २००२ च्या अधिसूचनेतील नियम क्र.८(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

Every Institution shall maintain two separate accounts, namely, the Maintenance Accounts and the Development Accounts.

तसेच एन.सी.टी.ई. च्या १८, जून २००२ च्या अधिसूचनेतील नियम क्र.८(३) मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी आहेत

" At least half of the proceeds of development fee shall be credited to the development account in the first ten years of establishment of the institution, after which this Account (Development Account) will receive the entire proceeds of this fee. Miscellaneous receipt of the institution would also be credited to the same account. The proceeds of this fee would be utilized for the procurement of equipment, books and journals, and the acquisition of assets. The management may debit expenditure on improvement of faculty to this account.

उपरोक्त दोन्ही तरतूदींचे महाविद्यालयांनी पालन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये अशाप्रकारे विकास शुल्काचे स्वतंत्र खाते ठेवल्याबाबत, त्यामधील जमा रकमेबाबत व त्यातून सोईसुविधांवर खर्च केल्याबाबतचे अभिलेख महाविद्यालयांनी सादर केलेली नाहीत, सबब समितीने यापूर्वी निश्चित करून दिलेल्या शुल्कामधील विकास शुल्क जमा केलेले स्वतंत्र बँक खात्याच्या विवरणपत्राची प्रत, सदर खात्यात एकूण जमा झालेले विकास शुल्क व त्यातून केलेला खर्च याची सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेली प्रत प्राप्त झाल्यानंतर विकास शुल्क मंजूरीबाबत निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्र.०४:-राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या संस्थास्तरावर शुल्क ठरविण्याच्या पध्दतीबाबत:-**

सदर विषयाबाबत समितीमध्ये खालील मुद्दयाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली.

राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना समितीने मान्य केलेले शिक्षण शुल्क व विकास शुल्क महाडीबीटी या शिष्यवृत्ती पोर्टलवर approve करण्याची कार्यवाही शिक्षण शुल्क समिती करते. अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळता उर्वरित महाविद्यालयांचे शुल्क समितीने निश्चित केले असल्यामुळे त्यास तात्काळ मान्यता देणे सुलभ होते. तथापि, अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत संस्थास्तरावर शुल्क निश्चिती करून थेट महाडीबीटी पोर्टलवर नमूद करून approval साठी पाठविण्यात येते, सन २०२०-२१ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर अल्पसंख्यांक महाविद्यालयाच्या शुल्कास approval देत असताना काही महाविद्यालयांनी फी मध्ये मागील शुल्काच्या तुलनेत दुप्पट/तीनपट अशी भरमसाठ शुल्कवाढ केलेली दिसून आली.

सदर बाबत समितीपुढे खालील अभिलेख सादर करण्यात आली.

१. एन.सी.टी.ई. नोटीफिकेशन दि.२५.०८.२०१०

२. एन.सी.टी.ई.चे पत्र दि.०९-११-२०१६ व

३. शासन पत्र दि.३१-१२-२०१८

उपरोक्त पत्रांच्या अनुषंगाने समितीमध्ये चर्चा झाली व अशा भरमसाठ फी वाढीमुळे विद्यार्थ्यांवर शुल्काचा अतिरिक्त भार पडत असल्यामुळे संस्था स्तरावर निश्चित करण्यात येणारे शुल्क हे एन.सी.टी.ई च्या मार्गदर्शक सूचना/आदेशांनूसार होते किंवा नाही याबाबत अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी समिती/अभ्यासगट स्थापन करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.०५:- दमयंतीताई देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रामटेक नागपूर यांनी सन २०१६-१७ ला प्रस्ताव सादर केला होता, त्यानुसार तेव्हाची एनसीटीईची मंजूर विद्यार्थी संख्या-१०० नूसार परिगणना करून सन २०१६-१७ करिता शुल्क निश्चिती करून देण्यात आली होती. तथापि शै.वर्ष २०१७ ला एन.सी.टी.ई. ने सदर महाविद्यालयांची विद्यार्थीसंख्या १०० वरून ५० पर्यंत कमी केली. त्यामुळे महाविद्यालयाने कळविल्यानूसार महाविद्यालयास केवळ ५० विद्यार्थ्यांचे शुल्क प्राप्त होत आहे. तरी सन २०१७-१८ पासून ५० विद्यार्थी संख्या गृहित धरून शिक्षण शुल्क निश्चित करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे, सदर बाब समितीच्या अवलोकनार्थ सादर.**

:-सदर महाविद्यालयास सन २०२१-२२ पासून ५० विद्यार्थी संख्या गृहित धरून शुल्क निश्चिती करून देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.०६:- शिक्षण शुल्क समितीने तयार केलेल्या नियमावलीमध्ये क्र.२.१.३ मध्ये ७ व्या वेतन आयोगाबाबत *As per VII th pay commission as applicable* वाक्य हे नव्याने समाविष्ट केलेले आहे, तरी या बदलास समितीची मान्यता मिळावी.**

:- नियमावलीतील उपरोक्त बदलास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.०७:-राज्यातील ज्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी समितीकडून शुल्क निश्चिती करून घेतले नाही/घेणार नाहीत, अशा महाविद्यालयांना दंड म्हणून रक्कम निश्चित करण्यात यावी/अन्यथा इतर कार्यवाहीबाबत निर्णय व्हावा.**

:-एनसीटीईच्या दि.१८ जून,२००२ च्या नोटीफिकेशन नूसार तसेच शा.नि.दि.०५.०७.२०१३ नुसार विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी दर ३ वर्षांनी शुल्क निश्चित करून घेणे बंधनकारक आहे, याबाबत या कार्यालयाचे पत्र दि.०८-०९-२०२१, दि.३०-०९-२०२१ व दि.२७-१०-२०२१ अन्वये महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्याबाबत वेळोवेळी संधी देण्यात आली होती. त्यानंतरही काही महाविद्यालयांनी शुल्क निश्चितीचे प्रस्ताव समितीकडे सादर केलेले नाहीत. याबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली व अशा महाविद्यालयांवर सद्यस्थितीत दंडात्मक कार्यवाही न करता प्रस्ताव सादर करण्यासाठी पुन:श्च एक संधी देण्यात यावी, तथापि अशी संधी दिल्यानंतरही विहीत मुदतीत जी महाविद्यालये शुल्क निश्चतीचा प्रस्ताव सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयाची नावे एन.सी.टी.ई., संबंधित विद्यापीठ, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक परिक्षा कक्ष (सीईटी सेल) यांना कळवून शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१०.० नूसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्याचा निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.०८:-डॉ.माणिकराव गुरसळ समितीने सूचविलेल्या शिफारशींनूसार दि.१०.०७.२०१९ च्या बैठकीच्या इतिवृत्तानूसार महाविद्यालयांकडून प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयाच्या झालेल्या खर्चावर ०.५ % रक्कम प्रक्रिया शुल्क म्हणून गोळा करणेबाबत तसेच त्यातून इतिवृत्तात दर्शविल्याप्रमाणे समितीचा खर्च भागविण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी गुरसळ समितीच्या शिफारशीनूसार दर्शविलेल्या बाबींवर होणारा समितीचा खर्च प्रक्रिया शुल्कातून अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

:-डॉ.गुरसळ समितीच्या इतिवृत्तातील सूचविलेल्या शिफारशींनूसार जमा झालेल्या प्रक्रिया शुल्कातून खर्च करण्यासाठी मान्यता मिळणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

**विषय क्र.०९:-शुल्क निश्चितीकरिता प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ तसेच खर्च लेखापाल यांना प्रस्ताव तपासणीसाठी रू.३६०/- प्रति प्रस्ताव एवढी रक्कम अदा करणेबाबत दि.०३-०१-२०१७ च्या च्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. सन २०२१-२२ करिता प्रस्ताव तपासणीसाठी मानधन वाढवून मिळणेबाबत खर्च लेखापालांकडून विनंती करण्यात आली आहे. शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा येथे प्रस्ताव तपासणीकरिता सनदी लेखापाल यांना देण्यात येणाऱ्या रू.४५०/- प्रति प्रस्ताव याप्रमाणे शिक्षणशुल्क समितीमधील शिक्षणतज्ज्ञ तसेच खर्च लेखापाल यांना प्रस्ताव तपासणीसाठी रू.४५०/- प्रति प्रस्ताव या मानधनास समितीची मान्यता मिळणेबाबत.**

:- शिक्षण शुल्क समितीकडे शुल्क निश्चितीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी खर्च लेखापाल/सनदी लेखापाल यांना रू.४५०/- प्रति प्रस्ताव एवढे मानधन अदा करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**१०. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

१. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१० ची अंमलबजावणी करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात यावी.

२. ज्या महाविद्यालयांचे शुल्क समितीने यापूर्वी मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा कमी झालेले आहे. (शुल्कात सन २०२१-२२ मध्ये घट झालेली आहे) अशा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून घेतलेले जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने परत करावे व तसे या कार्यालयास कळविण्याबाबत महाविद्यालयांना निर्देश दयावेत.

३. राज्यातील विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये शिक्षण शुल्क समितीने मंजूर करून दिलेल्या शुल्कानूसारच (शिक्षण शुल्क व विकास शुल्क) आकारतात किंवा कसे, याबाबत पावतीच्या आधारे पडताळणी करणे व याबाबतचा सविस्तर अहवाल मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे तसेच सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना सादर करण्यात यावा, असे ठरले.

४. ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात खुप घट झालेली आहे, अशा महाविद्यालयांना भेट देवून पायाभूत सोईसूविधांची एन.सी.टी.ई. च्या नियमानूसार असल्याबाबतची विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत तपासणी करण्यात यावी व अशा तपासणीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

५. शुल्क नियामक प्राधिकरणाप्रमाणे शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्यासाठी समितीचे संकेतस्थळ तयार करणे, पोर्टल विकसित करणे व त्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी करावी.

६. महाविद्यालयांकडून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन हे ६ व्या/७ व्या वेतन आयोगानूसार नसल्यास, तसेच प्रस्तावातील इतर अनुषंगीक समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी एन.सी.टी.ई. , संबंधित विद्यापीठ तसेच मा.संचालक,उच्च शिक्षण,पुणे यांना कळविण्यात याव्यात.

७.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून महाविद्यालयांना ना-हरकत प्रमाणपत्र देत असताना महाविद्यालयांची काटेकोरपणे तपासणी करूनच ते देण्यात यावे, असे आदेश मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना दयावेत.

८. नियमावलीतील मुद्दा क्र.२.११ बाबत संबंधित विद्यापीठांना कळविणे.

९. समितीतील अशासकीय सदस्यांना देण्यात येणारा बैठक भत्ता व प्रवास भत्ता याबाबत शासन स्तरावरून निर्णय होणेबाबत सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी पाठपुरावा करावा.

१०. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विशेष शिक्षण(दृष्टीहिन), धामडोद, ता. जि. नंदूरबार या महाविद्यालयास आर.सी.आय. ने सुरूवातीला ठरवून दिलेले शुल्क रू.७२०००/- होते. महाविद्यालयात केवळ ५ ते १० विद्यार्थी प्रवेश घेतात, तरी आर.सी.आय.कडे शुल्क निश्चितीचे कोणते निकष आहेत, याबाबत विचारणा करावी.

प्रस्तुत बैठकीत मंजूर करून दिलेल्या शुल्काबाबत काही आक्षेप असल्यास महाविद्यालयांनी ८ दिवसांच्या आत आवश्यक त्या अभिलेखांसह समितीस कळवावे.

सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदर बैठक समाप्त झाली.

**सदस्य सचिव,**
**शिक्षण शुल्क समिती तथा**
**शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे**

**अध्यक्ष,**
**शिक्षण शुल्क समिती तथा प्रधान सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई**